# अभिजीत अडसूळांना महायुतीतूनच विरोध का?

## रमेश बुंदिलेंच्या मागे 'कमळी' ची अदृष्य ताकद

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.11 )** - माजी खासदार संसद रत्न आनंदराव अडसूळ यांचे सुपूत्र अशी ओळख असलेले शिंदे गट शिवसेनेचे उमेदवार अभिजीत अडसूळ यांना सुरवातीपासून महायुतीमधील एका गटाकडून विरोध आहे. त्यांना उमेदवारी न देता ही जागा भाजपला सोडावी अशी मागणी या गटाकडून वारंवार होत होती. अजूनही हा विरोध कायम असून त्यांना निवडणूकीमध्ये यांचा फटका बसेल यात दूमत नाही. परंतू त्यांना महायूतीमधूनच इतका विरोध का? या प्रश्नाच्या खोलात गेल्यावर अनेक धक्कादायक कारणे समोर आली. अडसूळांच्या विरोधात असलेला या गटाची 'कमळी' ताकद अपक्ष उमेदवार रमेश बुंदिले यांच्या पाठीमागे अदृष्य शक्ती म्हणून सक्रीय असावी. ज्यामूळे अपक्षाची ताकद वाढून अडसूळांविरोधात 'अभि' मत 'जीत' असे सांगणारे वातावरण तयार होताना दिसत आहे.

मूळचे मुंबई येथील असलेले माजी खासदार आनंदराव अडसूळ पुर्वीपासून अनूसुचित जातीकरिता राखीव असलेल्या ठिकाणी आपले राजकिय 'बिऱ्हाड' घेवून जायचे. ते अनूसूचित राखीव असलेल्या बुलढाणा येथून 11, 13 आणि 14 व्या लोकसभेमध्ये खासदार राहीले, तेथील आरक्षण संपल्यावर अडसूळांनी आपले 'बिऱ्हाड' अनूसूचित जातीकरिता राखीव झालेल्या अमरावती लोकसभा मतदार संघात आणले. अडसूळांच्या एंट्रीनंतर अमरावती जिल्ह्यातील एकसंघ शिवसेना दुभंगण्याची ऐतिहासीक घटना घडली. आनंदराव अडसूळ अमरावती मतदारसंघात 15 व्या



लोकसभेत खासदार झाले. सर्वकाही ठीक सुरु असताना त्यांचे आणि त्यांच्या पुत्राचे लक्ष अनुसूचित जातीकरिता आरक्षित असलेल्या दर्यापूर मतदारसंघावर गेले. दोन भाग झालेल्या शिवसेनेपैकी एका गटाने अभिजीत अडसूळ यांना आयते आमदार केले. सर्व काही वडीलोपार्जित मिळाल्याने दर्यापूरातील शिवसैनिक हे आपले 'घरगडी' अशी वागणूक या शिवसैनिकांना मिळायला लागली होती, अशी माहिती तत्कालीन एका शिवसैनिकाने 'दै.महासागर' ला दिली. आमदाराकडून वडीलधाऱ्या शिवसैनिकांचा एकेरी आवाजात पुकारा व्हायला लागला. थेट बाळासाहेबांचे विश्वासू म्हणून ओळख असल्याने खासदार पुत्राच्या एकेरी पुकाऱ्याला 'ओ' म्हणत या जेष्ठ शिवसैनिकांना साद द्यावी लागत असे. परंतू हे दुखावलेले शिवसैनिक अभिजीत अडसूळांच्या आमदारकीचे पाच वर्षातील दिवस बोटावर मोजत होते. पाच वर्षानंतर पुन्हा निवडणूका लागताच त्यांच्यापुढे रमेश बुंदीले नावाचा पर्याय उभा झाला, याच शिवसैनिकांनी अभिजीत अडसूळांना दर्यापूर मतदारसंघातून हद्दपार केले. तेव्हाच्या याच खंदे शिवसैनिकांच्या हातात आज कमळ आहे. परंतू दर्यापूर मतदारसंघ वाचविण्याकरिता त्यांची तळमळ तीच आहे. त्यामूळेच ते आजही 'गो पार्सल गो' चा नारा देत अपक्षांच्या पाठीशी अदृष्य शक्तीचे काम करित आहे. ज्याचा परिणाम अवघ्या काही दिवसात पुढे येईल.



# ट्रक-कारमध्ये धडक, मेव्हणा-जावई ठार

## अमरावतीहून नाशिकला जाताना अपघात | दोघे गंभीर जखमी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.11 )** - नाशिक येथे आपल्या वहिनीच्या अस्थिकलशाचे विसर्जन करण्याकरिता जात असलेले शहरातील एक व्यापारी व त्यांच्या जावयाचा संभाजी नगर येथे ट्रक आणि कारमध्ये झालेल्या अपघातात मृत्यू झाला. ही घटना रविवारी रात्री घडली. अमरावती शहरातील जयस्तंभ चौकात असलेल्या आनंद खिलौना नामक दुकानाचे संचालक रामचंद मेठाणी (रा. रामपुरी कॅम्प) आणि त्यांचे जावई नामदेव पोपटानी (रा.नंदुरबार), अशी मृतांची नावे आहेत. जखमींमध्ये दीपक मेठाणी आणि रमण टेकवानी यांचा समावेश आहे.



राम मेठानी



नामदेव पोपटानी

रामचंद मेठाणी यांचे शहरातील जयस्तंभ चौकात अमर सोडा फॅक्टरी आणि आनंद खिलौना नामक दोन प्रतिष्ठान आहे. राम मेठाणी यांच्या वहिनीचे काही दिवसांपूर्वी निधन झाले. त्यांचा अस्थिकलश नाशिकला नेण्यासाठी ते दोन पुतणे आणि जावई यांच्यासह क्रेटा कारमधून निघाले. मात्र रविवारी रात्री अचानक संभाजी नगर रस्त्यावर ट्रकने त्यांच्या कारला धडक दिली. हा अपघात एवढा भीषण होता की रामचंद मेठाणी व नामदेव पोपटानी यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात अन्य दोन जण जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. या घटनेची माहिती अमरावती शहरातील रामपुरी कॅम्पमध्ये पसरताच शोककळा पसरली. राम मेठाणी हे व्यापारी असण्यासोबतच सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रमातही अग्रेसर होते. त्यांच्या निधनाने सिंधी समाजात शोकाकुल वातावरण आहे. सोमवारी सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यासाठी व्यापाऱ्यांनी सायंकाळी 6 ते 8 वाजेपर्यंत आस्थापना बंद ठेवून अंत्यसंस्काराला उपस्थित राहून श्रद्धांजली वाहिली.

# पथ्रोटमध्ये गांजा विक्रेत्याला अटक

## दिड किलो गांजा जप्त


## एलसीबीची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.11 )** - पथ्रोट येथे अवैधरित्या गांजा विक्री करणाऱ्या आरोपीला ग्रामीण गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. आरोपींकडून 1 किलो 541 ग्रॅम गांजा आणि मोबाईल असा एकूण 32 हजार 500 रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. 10 नोव्हेंबर रोजी ही कारवाई करण्यात आली.

अल्केश चक्रधर राऊत (25, वॉर्ड क्र.1, पथ्रोट) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी जिल्ह्यात परवाना नसताना अवैधरित्या गांजा बाळगणाऱ्या व विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यादृष्टीने 10 नोव्हेंबर रोजी पथ्रोट पोलिस ठाण्यातंर्गत ग्रामीण गुन्हे शाखेचे पथक गस्त घालत होते. यावेळी पथ्रोट येथील अल्केश राऊत हा गाव शिंदी रस्त्यावर गांजा विक्रीसाठी उभा असल्याची गोपनीय माहिती मिळाली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळ गाठून अल्केश राऊतला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडून 22 हजार 500 रुपये किमतीचा 1 किलो 541 ग्रॅम गांजा आणि 10 हजार रुपये किमतीचा मोबाईल असा एकूण 32 हजार 500 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी अल्केश राऊत आणि जप्त केलेला माल पथ्रोट पोलिस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आला आहे. वरील कारवाई पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वाखाली नितीन इंगोले, सुनील महात्मे, सय्यद अजमत, सुधीर बावणे, नीलेश डांगोरे, चालक संजय प्रधान यांनी केली.



# अनियंत्रित भरधाव कार चढली दुभाजकावर

## रहाटगाव, रिंगरोड रोडवर घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.11 )**- भरधाव कार रहाटगाव-नवसारी रिंगरोडवरील अचानक दुभाजकावर चढल्याने खळबळ उडाली होती. अपघात इतका भीषण होता की, कारचे काही भाग चकनाचूर होऊन रस्त्यावर पडला. ही घटना रविवारी रात्री साडे आठच्या सुमारास घडली. याप्रकरणात निकितेश भास्करराव भागवत (27, रा. गोपाल नगर, अमरावती) याच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी वैभव डाबरे (30, रा. विलास नगर) यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

निकितेश भागवतच्या तक्रारीनुसार, निकेतेश व वैभव डाबरे हे मित्र असून, ते वाहन क्रमांक एमएच 27 / डीई 6219 ने जात होते. दरम्यान राजपुत ढाबा चौकात त्यांचे भरधाव वाहन हे अनियंत्रीत होऊन दुभाजकावर चढले. या अपघातात निकीतेश जखमी झाला. या घटनेनंतर घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. गाडगेनगर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### मतदानासाठी कामगारांना सुटी देण्याचे आवाहन

**अमरावती** - विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीत सर्वांना मतदान करता यावे यासाठी, कामगार आणि कर्मचाऱ्यांना सुटी दयावी, असे आवाहन करण्यात आले आहे. विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतदान दि. 20 नोव्हेंबर 2024 रोजी होणार आहे. या निवडणूकीमध्ये सर्व मतदारांना त्यांच्या मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रातील कोणत्याही व्यवसायात, व्यापारात, औद्योगिक उपक्रमात किंवा इतर कोणत्याही आस्थापनेमध्ये कार्यरत असलेल्या आणि राज्याच्या विधानसभेच्या निवडणूकीत मतदान करण्याचा अधिकार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला, मतदानाच्या दिवशी सुटी दिली जाईल. मतदानाच्या दिवशीची सुटी उद्योग विभागांतर्गत येणाऱ्या सर्व उद्योग समूह, महामंडळ, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना इत्यादींना लागू राहील.

# आमदार यशोमती ठाकूर यांच्या प्रचाराचे बॅनर फाडले

- वलगाव पोलीस ठाण्यात तक्रार
- नया अकोल्यातही बॅनर जाळण्याचा प्रयत्न

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.11 )**- तिवसा विधानसभा मतदारसंघातंर्गत वलगाव आणि नया अकोला येथे काँग्रेस उमेदवार यशोमती ठाकूर यांच्या प्रचारासाठी लावलेले बॅनर अज्ञातांनी फाडले, तसेच नया अकोला गावात यशोमती ठाकूर यांच्या प्रचारासाठी लावलेले बॅनर जाळण्याचा प्रयत्न झाला. या दोन्ही घटनेची तक्रार काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी वलगाव पोलीसांना दिली आहे.

हा सर्व प्रकार रविवारी रात्री घडला. सोमवारी सकाळी ही माहिती मिळताच काँग्रेसचे कार्यकर्ते वलगाव आणि नया अकोला येथे पोहोचले. वलगाव येथील अहिल्यादेवी चौक, धनगरपुरा परिसरात अनेक ठिकाणी यशोमती ठाकूर यांचे बॅनर फाडल्याची माहिती आहे. वलगाव आणि नया अकोला येथे यशोमती ठाकूर यांच्या प्रचारासाठी लावण्यात आलेले बॅनर फाडल्याप्रकरणी अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीश मोरे यांनी वलगाव पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात तक्रार दाखल केली आहे. विरोधकांनी हे कृत्य केल्याचा आरोप त्यांनी केला. याप्रकारे विरोधकांची विकृत मानसिकता उघड होत असल्याचे हरीश मोरे म्हणाले. याप्रकरणी वलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना इफेक्टीव्ह लिसनिंग स्किल या विषयावर मार्गदर्शन

**अमरावती** - शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथील विद्यार्थ्यांना 'इफेक्टीव्ह लिसनिंग स्किल' या विषयावर अतिरिक्त जिल्हाधिकारी रविंद्र धुरजड यांनी नुकतेच मार्गदर्शन केले. श्री. धुरजड यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्रथम वर्ष एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांना इफेक्टिव्ह लिसनिंग स्कील या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना याबाबत मार्गदर्शन केले. नवनिर्मित वैद्यकीय महाविद्यालयाचा अधिकाधिक लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. किशोर इंगोले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपअधिष्ठाता डॉ. नितीन अंभोरे यांनी केले. सहायक प्राध्यापक डॉ. मिनोती पोकळे यांनी संचालन केले.

# दिव्यांगांना मतदानासाठी दिव्यांग रथाची सोय

**अमरावती** - अमरावती विधानसभा मतदारसंघासाठी दि. 20 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रावर जाणे सुलभ व्हावे, यासाठी दिव्यांग रथ तयार करण्यात आला आहे. हा दिव्यांग रथ दिव्यांगांना मतदान केंद्रावर घेऊन जाणार आहे.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने दिव्यांग मतदारांकरीता मतदान केंद्रापर्यंत पोहोचविणेकरीता अमरावती विधानसभा मतदारसंघात दिव्यांग रथाची सोय करण्यात आली आहे. मतदारसंघ क्षेत्रातील दिव्यांग मतदारांच्या सोयीकरीता या दिव्यांग रथाची निर्मिती करण्यात आली आहे.

ज्या दिव्यांग मतदारांना मतदानकेंद्रापर्यंत पोहोचण्यासाठी सहाय्याची गरज आहे, अशा मतदारांनी दि. 20 नोव्हेंबर 2024 रोजी या दिव्यांग रथाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेले आहे. तसेच अमरावती विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील दिव्यांग मतदारांकरीता मदत कक्षाची स्थापना केले आहे. दिव्यांग रथाची आवश्यकता असलेल्या मतदारांना मदत कक्ष प्रतिनिधी तथा ग्राम महसूल अधिकारी सुनिल भगत, संपर्क क्रमांक 9890698712 यांचेशी दि. 20 नोव्हेंबर 2024 रोजी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# तीन दुचाकी चोरांना अटक



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.11 )** - दुचाकी चोरी प्रकरणी गाडगे नगर पोलिसांनी तीन चोरट्यांना अटक केली.

आकाश प्रकाश रंगारी (30, रा. केवल कॉलनी, गुणवंत वाडी रोड, अमरावती), रोहीत सुनिल कावलकर (26, रा. गाडगेनगर, पाण्याच्या टाकी मागे, अमरावती) व विश्वजीत शेषराव ढोमणे(40, रा. बाबुळगाव जहागीर, ग्राम पंचायत समोर ता.जि. अकोला) या नावाने या दुचाकी चोरट्यांची ओळख पटली आहे. त्यांच्या ताब्यातून 2 लाख 45 हजार रुपये किमंतीच्या सहा दुचाकी जप्त करण्यात आल्या आहे.

## सहा दुचाकी जप्त

शितल कुमार विष्णुपंत ढोले (42, रा. आशीस विहार, अर्जुनगर, अमरावती) यांनी 23 ऑक्टोबर रोजी गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती की, त्यांची एमएच 27/ एयु 1929 क्रमांकांच्या ड्रीम युगा ही दुचाकी अमरावती कोर्टाचे पार्कींगमधून अज्ञात इसमाने चोरुन नेली आहे. या तक्रारीवरून गाडगेनगर ठाण्यात अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याच्या तपासात पोलिसांनी आरोपी आकाश प्रकाश रंगारी, रोहीत सुनिल कावलकर व विश्वजीत शेषराव ढोमने यांची पोलिस कोठडीत चौकशी केली असता, त्यांनी दुचाकी चोरीच्या गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून ड्रीम युगा दुचाकी जप्त करण्यात आली. त्याचप्रमाणे आरोपींनी सहा दुचाकी जप्त केल्या आहेत. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त सागर पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त अरुण पाटील, पोलिस निरीक्षक ब्रम्ह गीरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सदर कार्यवाही गाडगेनगर डी.बी. पथक प्रमुख एपीआय मनोज मानकर, पोलिस हवालदार निलेश जुनघरे, संजय भिलाये, गजानन बरडे, सागर धरमकर, सुशांत प्रधाण, मतीन शेख यांनी केली आहे.

# रवी राणांबाबत आम्हाला प्रश्न विचारु नये-भाजप प्रवक्ते

## महायुतीच्या उमेदवारांविरुध्द करत असलेल्या कारवायांवर टाकला पडदा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.11 )** - लोकसभेचा सूड उगविण्याकरिता राणा दाम्पत्य 7 मतदार संघामध्ये प्रस्थापितां विरुध्द खेळी करताना दिसत आहे. ते महायुतीमध्ये राहून महायुतीच्या मित्रपक्षांचा उमेदवारांच्याविरुध्द कारवाया करित असल्याचे दिसत आहे. भाजपच्या एका पत्रकार परिषदेमध्ये राणा दाम्पत्यांच्या या कारवायांबाबत प्रश्न विचारल्यावर भाजप चे प्रवक्ते शिवराय कुळकर्णी यांनी रवी राणांबाबत आम्हाला प्रश्न विचारु नये असे म्हणत, त्यांच्या कारवायांवर पडदा टाकला. ज्यामूळे आता महायुतीमधील



कलह आणखीन फोफाविणार असल्याचे दिसत आहे.

'बेगानी शादी में अब्दुल्ला दिवाना' या वाक्याला साजेसी कृती माजी खासदार तथा भाजप नेत्या नवनित राणा अमरावती मतदार संघात करत असल्याचे दिसत आहे. नवनित राणा यांचे पती रवी राणा हे बडनेरा मतदारसंघात उभे असताना नवनित राणा या अमरावती मतदारसंघात वेगळ्याच पध्दतीचा प्रचार रथ फिरवीत आहे. या प्रचार रथावर नवनित राणा व भाजपचा कमळ असे चित्र असलेले बॅनर लागले आहेत. वाहनावर लागलेल्या लाऊड स्पीकरमधून 'मला पाडणाऱ्यांना तुम्ही धडा शिकवा', असे सांगत हिंदुत्वाच्या आणाभाका दिल्या जात आहे. याबाबत विचारलेल्या प्रश्नावर कुळकर्णी यांनी त्या काँग्रेसविरुध्द बोलत असल्याचे सांगून प्रश्नातून अलगद निसटण्याचा प्रयत्न केला. मात्र स्वतः रवी राणा 'अमरावती ची एक सीट पडली तरी चालेल, पण जिल्ह्यात कमळ फुलवा' असे म्हणत आहेत. याबाबत प्रश्न विचारल्यावर कचाट्यात अडकलेल्या कुळकर्णी यांनी रवी राणांबाबत प्रश्न विचारु नये, असे म्हणत हात वर केले. त्यामूळे घड्याळला पराभूत करण्याकरिता वरुडमध्ये प्रत्यक्ष आणि अमरावतीमध्ये अप्रत्यक्ष 'कमळ' कामाला लागले असल्याचे भासत आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४




# मतदान जनजागृतीसाठी तिरंगा महारॅली




## मतदारांच्या सक्रीय सहभागाने मतदानाचा टक्का वाढणार-जिल्हाधिकारी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.11 )-स्वीप उपक्रमांतर्गत जिल्हा प्रशासन, महापालिका आणि विविध संस्था, संघटनांच्या मदतीने आज अमरावती येथे मतदार जनजागृतीसाठी तिरंगा महारॅली काढण्यात आली. नेहरू मैदान येथे झालेल्या उद्घाटन कार्यक्रमाला जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी आदी उपस्थित होते.**










उपस्थित मान्यवरांनी रॅलीला हिरवा झेंडा दाखविला. राजकमल, जयस्तंभ, इर्विन चौक मार्गे ही रॅली निघून विभागीय क्रीडा संकुलात समारोप करण्यात आला.समारोपावेळी जिल्हाधिकारी कटियार यांनी महारॅलीचे आयोजन उत्कृष्ट प्रकारे झाले आहे. यात सर्व नागरिकांनी सहभाग नोंदविला आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदविल्यामुळे मतदानाच्या टक्केवारीत वाढ झाली होती. मात्र शहरी भागात मतदान कमी होत असल्यामुळे त्यांच्यापर्यंत पोहोचून जागरूकता करणे गरजेचे आहे. त्यांच्यापर्यंत मतदान करण्याचा संदेश पोहोचल्यास मतदानाच्या टक्केवारीत निश्चितच वाढ होणार आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकांनी आपले कर्तव्य समजून मतदान करावे, असे आवाहन केले.

कलंत्रे यांनी मतदारांमध्ये जनजागृतीसाठी रॅलीचा उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये विविध घटकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. त्यामुळे हा उपक्रम यशस्वी झाला आहे.कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राथमिक शाळा रहाटगाव आणि प्रगती विद्यालय रहाटगाव यांनी पथनाट्य सादर केले. या पथनाट्यातून मतदान जागृतीचा संदेश देण्यात आला. त्यानंतर उपस्थित मान्यवरांना मतदानाची प्रतिज्ञा देण्यात आली. तसेच मतदानासाठी नागरिकांना जागरूक करण्यासाठी मान्यवरांनी हवेत फुगे सोडले. विभागीय क्रीडा संकुलात मानवी साखळी करण्यात आली. यातून 'गो वोट'चा संदेश देण्यात आला. तसेच मनपा शाळेने पथनाट्य सादर करण्यात आले. दिव्यांनी 'गो वोट' साकारण्यात आले. शिक्षण अधिकारी मेश्राम यांनी आभार मानले.

# तुळशी विवाहाचे लागले वेध

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, ( दि.11 ) -** तुळशी विवाह हा विष्णूचा तुळशीशी विवाह लावण्याचा पूजोत्सव आहे. कार्तिक शुद्ध एकादशीपासून ते कार्तिक पौर्णिमेपर्यंत तुळशी विवाह करण्याचा प्रघात आहे. कार्तिक शुक्ल एकादशी ते पौर्णिमा असे पाच दिवस हा ऊत्सव चालतो.

आपल्या हिंदू धर्मात तुळशीला माता लक्ष्मी समजून तिचे पूजन केले जाते. त्याचबरोबर तुळशीचे दुसरे नावही विष्णुप्रिया आहे. कारण तुळशी माता विष्णूची पत्नी मानली जाते. दरवर्षीप्रमाणे



कार्तिक शुक्ल पक्षाच्या बाराव्या दिवशी तुळशी विवाह सोहळा संपूर्ण महाराष्ट्रभर साजरा केला जातो. दिवाळी झाल्यानंतर देवउठणी एकादशीच्या दिवशी तुळशीविवाह केल्या जाते. या नंतर लग्नसराईला सुरुवात होते. देवउठणी एकादशीच्या दिवशी भगवान विष्णू चार महिन्यांनी योगनिद्रातून जागे होतात आणि या दिवसापासून चातुर्मास संपतो. या दिवसाला देवोत्थान एकादशी किंवा प्रबोधिनी एकादशी असे म्हणतात.

### तुळशी विवाहाचे महत्व


हिंदू धर्मात कन्यादानाला महादानाच्या श्रेणीत स्थान देण्यात आले आहे. असे मानले जाते की जे लोकं तुळशी विवाहाची परंपरा पाळतात, त्यांना कन्यादानासारखेच फळ मिळते. तुळशीविवाह घराच्या अंगणात करावा. यासाठी सूर्यास्तानंतरची संध्याकाळची वेळ निवडा. असे मानले जाते की ज्या घरात शालिग्राम जी (भगवान विष्णु) आणि तुळशी मातेचा विवाह होतो त्या घरात लक्ष्मीचा वास असतो.

# निवडणुक काळात भाज्यांचे भाव कडाडले

## जनसामान्यांच्या खिशाला महागाईची फोडणी

**महासागर प्रतिनिधी**

**पथ्रोट,( दि.11 )** -राज्यात निवडणुकीसोबत भाज्यांचे भावही तापू लागले आहेत. आगामी निवडणुकांच्या तोंडावर महागाईही वाढू लागली आहे. किरकोळ बाजारात लसूण 500 रुपये दराने विकला जात आहे तर कांदा 80 रुपये किलो झाला आहे. हिवाळ्यात येणारा वाटाणाही महागला. निवडणुकीच्या काळात झालेल्या या भाववाढीमुळे नागरिकांमध्ये नाराजी आहे.



मागच्या आठवड्यात बाजार समितीत कांदा 18 ते 48 रुपये किलो दराने विकला जात होता. हाच कांदा आता 35 ते 60 वर पोहचला आहे. किरकोळ बाजारात कांद्याचा भाव 70 ते 80 रुपये झाला आहे. दोन आठवडे कांदा दर तेजीत राहतील, असा अंदाज व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे. परतीच्या पावसाचा फटका कांदा उत्पादनावर झालेला दिसत आहे. यामुळे कांद्याची आवक कमी होऊ लागली आहे.

### लसूण 500 पार

किरकोळ बाजारामध्ये लसूण 500 रुपये किलो दराने विकला जात आहे. नवीन वर्षात किरकोळ बाजारात मेथीची जुडी 30 रुपये दराने विकली जात आहे. तर लसूणच्या दरही कडकडले आहेत. शेवग्याच्या शेंगाचे दर किरकोळ बाजारात 130 रूपयांवर पोहचले असून वालाच्या शेंगा 100 रुपयांना विकल्या जात आहेत.

# हा झेंडा भल्या कामाचा!

## बच्चू कडूंच्या प्रचाराची धुरा महिलाशक्तीच्या खांद्यावर

## स्वयंस्फूर्तीने गावागावात प्रचार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.11 )-** जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघाची तुलना केली तर लोकसभेप्रमाणे आताही बडनेरा मतदारसंघात सभेला व प्रचाराकरिता 300 रुपये रोज देवून महिला-पुरुष आणावे लागत आहे. या उलट अचलपूर मतदारसंघात 'हा झेंडा भल्या कामाचा' म्हणत महिलांनी स्वयंस्फुर्तीने प्रचारात उडी घेतल्याचे चित्र आहे.

बच्चू कडू कायम गोरगरिब, दिव्यांग स्वत:च्या पायावर उभे राहावे यासाठी प्रयत्नशील असतात. बच्चू कडू यांच्या माध्यमातून अनेक संकटात सापडलेले कुटुंब स्वत:च्या पायावर उभे राहून त्यांनी आर्थिक उन्नती साधली, यामुळेच पुन्हा बच्चू कडू यांनी आपले आणि आपल्या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करावे यासाठी बच्चू कडू यांच्या आदेशाची वाट न पाहता महिलांनी स्वत: प्रचाराची धुरा आपल्या खांद्यावर घेऊन गावागावात बच्चू कडू यांचा स्वयंस्फूर्तीने प्रचार करत आहे.

चांदुरबाजार तालुक्यातील टाकरखेडा,आसेगाव या परिसरातील महिला भगिनींनी प्रत्येक घरी जाऊन बच्चू कडू यांनी केलेल्या कार्याची माहिती जनतेपर्यंत पोहचवता आहेत.प्रचारात विधवा,



परितक्त्या,दिव्याग, महिलांचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे. कुटुंबावर कुठल्याही प्रकारचे संकट आल्यास त्या कुटुंबाचे संकटमोचक म्हणून बच्चू कडू सदैव उभे असतात, अनेक संकटात सापडलेल्या कुटुंबाचे पालकत्व सुद्धा बच्चू कडू यांनी स्वीकारलेले आहे.शेतकरी आत्महत्येनंतर त्या कुटुंबातील सदस्यांना सन्मान देण्याचे काम बच्चू कडू यांनी केले असून अनेक आत्महत्याग्रस्त कुटुंबांना स्वत:च्या पायावर उभे करण्यात प्रहार जनशक्ती पक्षाची मोठी भूमिका असल्याचे या महिला नागरिकांना पटवून देत आहे. बच्चू कडू यांना कोणत्याही प्रचाराची गरज नसून बच्चू कडू हे आमच्या मनातील नेते आहेत आणि त्यांचा विजय पक्का आहे अश्या भावना यावेळी सर्वसामान्य नागरीक बोलून दाखवत आहेत.या प्रचार रॅली मध्ये प्रहार महिला तालुका आघाडीच्या स्टेला, दीपा तंतरपाळे, पल्लवी खैरकर, शारदा सहारे,अनिता धाकडे, दीपा धाकडे, सीमा वानखडे, वर्षा मोरे, शालुताई टेकाम, नीता सरदार, सीमा बादशे यांच्यासह गावातील अनेक महिलांचा स्वयंस्फूर्तीने सहभाग आहे.

### जनसामान्यां मधून प्रतिसाद

वीस वर्षापासून सलग आमदार असलेले बच्चू कडू यांच्या सामाजिक कार्याचे प्रत्येक गावात अनेक उदाहरणे आहेत. बच्चू कडू यांनी परिवर्तन महाशक्ती स्थापन केल्यामुळे राज्यात ज्या ठिकाणी उमेदवार उभे केलेत त्यांनाही वेळ द्यावा लागतो, त्यामुळे बच्चू कडू यांची प्रतीक्षा न करता गावागावातील महिला, पुरुष, युवकांनी स्वत:च ही निवडणूक खांद्यावर घेऊन प्रचाराला सुरुवात केली. एखाद्या लोकनेत्याप्रति एवढा आदर केवळ अचलपूर मतदार संघातच पाहायला मिळत आहे हे विशेष!

# डॉ. निलेश विश्वकर्मा यांना विविध संघटनांचा पाठींबा

## तेली, माळी, फासेपारधी, पंजाब खालसा एट संघटना उतरली प्रचारात



**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर रेल्वे, ( दि.11 ) -** विधानसभेची जसजशी निवडणूक जवळ येऊ लागली आहे, तस तसे वातावरण चांगलेच तापू लागले आहे. वंचीत बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ. निलेश विश्वकर्मा यांना सोमवारी तेली, माळी, फासेपारधी, पंजाब खालसा एट संघटनेने जाहीर पाठींबा दिला आहे.

वंचीत बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ. निलेश विश्वकर्मा हे गेल्या सहा दिवसांपासून मतदार संघातील तिन्ही तालुके पिंजुन काढत आहे. डॉ. निलेश विश्वकर्मा यांना मिळत असलेला प्रतिसाद पाहता विरोधी पक्षाचे धाबे दणाणले आहे. जस जशी निवडणूक जवळ येत असून, वातावरण सुध्दा चांगलेच तापायला सुरुवात झाली आहे. डॉ. निलेश विश्वकर्मा यांना सोमवारी नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील हिंगलापूर येथील माळी समाजाच्यावतीने पाठींबा देण्यात आला असून, यामध्ये नामदेव निकोडे, वैभव वर्हेकर, अंगतराव वर्हेकर, श्रीकांत भोयर, रोहीत निकोडे, मुरलीधर निकोडे यांचा समावेश आहे. तर तेली समाजाच्यावतीने धानोरा फरशी येथील राहुल हिगांसपूरे, मोहन हिंगासपूरे, संजय गुल्हाने, तर पंजाब खालसा एट संघटनेकडून कर्तासिंग, जपतसिंग, जगनसिंग, निलेशसिंग, सुमित सिंग, राहुल सिंग यांचा समावेश आहे. तर फारेपारशी समाजाच्यावतीने अभय पवार, सुभाष भोसले, गजानन पवार, रमेश पवार, नकासिंग भोसले, राज पवार, शिवा पवार, नितीन भोसले, राजेंद्र भोसले (सर्व रा. नांदगाव) यांचा समावेश आहे.

डॉ. निलेश विश्वकर्मा यांना मिळत असलेला विविध संघटनेचा पाठींबा, त्यामुळे त्यांना या निवडणूकीत मोठे बळ मिळत आहे.